**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – कोमल कृष्णकांत तोंडवळकर

माझे वय – १८ वर्षे,

व्यवसाय – शिक्षण

रा. – कोळंब, खडवण नाका, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत.</u>**

०१. दि.०४/११/२०२१ रोजी कोळंब येथे मी माझ्या घरी होते. आरोपी हे माझे वडील आहेत. सदर दिवशी सकाळी ११.३० वा. माझे बाबा दारु पिऊन घरी आले होते. त्यांनी माझ्या आजोबा सुभाष भिकाजी मुणगेकर यांना शिवीगाळ करण्यास सुरवात केली. माझ्या आईने त्यांना शिवीगाळ करु नका असे सांगितले. त्यामुळे माझ्या वडिलांना राग आला, त्यांनी लाकडी दांडयाने माझ्या आईला मारण्यासाठी धावले. त्यांनी माझ्या आईचे केस पकडून ओढू लागले. मी सोडवण्यासाठी मध्ये पडले. त्यावेळी दांडयाने माझ्या डोक्यावर मारले. माझे वडील घरातील कोयता घेण्यासाठी घरामध्ये जात होते, त्यावेळी त्यांनी दोघांनाही ठार मारणार असे म्हणाले. माझे त्याप्रमाणे पोलिसांनी टिपण घेतले होते. मला ज्या दांडयाने मारहाण झाली होती, तो दांडा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता **<u>एम.ओ.नं.१</u>** वरील लाकडी दांडा दाखविण्यात आला. मारहाण झालेला दांडा हाच आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.के.जाधव यांचे मार्फत.</u>**

०२. मी आता बारावी सायन्सची परिक्षा दिलेली आहे. माझे पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद, रेवंडी शाळेत झाले आहे. माझे सहावीपासून ते बारावी पासूनचे शिक्षण टोपीवाला हायस्कूल येथे झालेले आहे. माझ्या बहीणीचे पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद, रेवंडी शाळेत झाले आहे, त्यानंतरचे शिक्षण टोपीवाला हायस्कूल येथे झालेले आहे. मी व माझी बहीण शिक्षण सुरु असताना माझ्या आजी व आजोबांकडे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सोबत माझी आई राहत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी

माझ्या आई सोबत राहत नव्हते, त्यामुळे माझ्या आईवडिलांमध्ये काय सुरु होते याबाबत मला प्रत्यक्ष माहिती नव्हती. मला खेळाची आवड आहे. खेळामध्ये मला कबड्डी व खो–खो हे खेळ मला आवडतात. हे म्हणणे खरे आहे की, कबड्डी खेळताना बऱ्याच वेळा खाली पडत असतो. हे म्हणणे खरे आहे की, कबड्डी खेळताना बऱ्याच वेळा हाताला, पायाला, खांदयाला व पाठीला दुखापत होते. हे म्हणणे खरे आहे की, कबड्डी खेळताना प्रतीपक्षाने पायाला पकडल्यास हाताला, पायाला व केव्हा केव्हा डोक्याला दुखापत होऊ शकते. हे म्हणणे खरे आहे की, खो–खो खेळताना एखादया खेळाडूला पकडताना झेप मारावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, झेप मारल्यानंतर हाताला, पायाला, गुडघ्याला व डोक्याला दुखापत होते. हे म्हणणे खरे आहे की, एखादया खेळाडूला पकडताना खांब मारावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, खांब मारताना कधी कधी हात मुरगळतो व कधी कधी हाताला दुखापत होते. हे म्हणणे खरे आहे की, खो–खो खेळताना उडी मारतेवेळेस डोक्याला दुखापत होते.

०३. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही भाडयाने राहतो ही बाब दर्शविण्यासाठी आमच्याकडे कुठलाही भाडे करार अथवा इतर कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०४/११/२०२१ कोळंब, खडवण नाका येथे राहण्यासाठी होतो ही बाब दर्शविण्यासाठी कुठलाही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, संतोष मुणगेकर हे माझे सख्खे मामा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी आजोळी राहत असताना माझे सर्व लाड माझे आजोबा व मामा करत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील हे पाल व बेडूक यांना घाबरत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई माझ्या वडिलांकडे पैसे मागत होती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, घर खर्चासाठी पैसे मागत होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईवडिलांमध्ये पैश्याच्या कारणावरुन भांडणे होत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईवडिलांमध्ये टि.व्ही चॅनलवरुन सुध्दा भांडण होत होते. हे म्हणणे खरे नाही की, यापुर्वी माझे व माझ्या वडिलांचे कधीही भांडण झाले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगते की, दारु पिऊन मला मारहाण करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी व पोलिसांची कधी भेट झाली होती हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, दि.०५/११/२०२१ रोजी झाली होती.

०४. मला काठी व दांडा यातील फरक माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दांडा

हा आकाराने जाड असतो व काठी आकाराने बारीक असते. मी पोलिसांना जबाब देताना, मला 'दांडयाने' मारहाण झाली होती ही बाब सांगितली होती. मला आता माझा पोलीस जबाब दाखविण्यात आला. सदरची बाब माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलिसांना जबाब देताना, मी सोडवण्यासाठी 'मध्ये' पडले, त्यावेळी 'दांडयाने' माझ्या डोक्यावर मारले या बाबी सांगितल्या होत्या. माझ्या पोलीस जबाबामध्ये 'मध्ये' पडले व 'दांडयाने' मारले या बाबी का नमुद नाहीत याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनास्थळापासून पोलीस स्टेशनला येण्यासाठी अर्धा तास लागतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शाळेमध्ये कायदेविषयक शिबीरांचे मार्गदर्शन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कायदेविषयक शिबीरांमध्ये एखादी घटना घडल्यास त्या बाबत १०० क्रमांकावरती फोन करुन माहिती देण्यासाठी माहिती दिली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या आईने १०० क्रमांकावरती फोन करुन घटनेची माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या आईला १०० क्रमांकावरती फोन करुन घटनेची माहिती देणे शक्य होते. हे मला सांगता येणार नाही की, घटनेनंतर पोलीस स्टेशनला किती वाजता पोहोचलो होतो.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४/११/२०२१ रोजी मी माझ्या घरी असताना माझे वडील आले होते व माझ्या आजोबांना शिवीगाळ करु लागले होते, शिवीगाळ करत असताना माझी आई शिवीगाळ करु नका असे माझ्या वडिलांना सांगत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील लाकडी दांडा घेऊन माझ्या आईला मारायला धावले होते, त्यावेळी मी माझ्या आईला सोडवण्यासाठी गेले होते, त्यावेळी माझ्या वडिलांना मला काठीने डोक्यावरती मारले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, एम.ओ.नं.१ वरील वस्तु हा दांडा नाही. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ वरील वस्तु हे शेतामध्ये कुंपणासाठी लावलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, घरामध्ये चुलीमध्ये जाळण्यासाठी सुध्दा एम.ओ.नं.१ वरील वस्तुचा वापर केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ वरील वस्तु सहजपणे शेतामध्ये उपलब्ध होते. हे म्हणणे खरे आहे की, मला एम.ओ.नं.१ वरील वस्तु वरील खाणाखुणा व त्याचे मोजमाप सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी मी साक्ष देण्यासाठी माझ्या आईसोबत आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने मला ज्याप्रमाणे सांगितले त्याप्रमाणेच मी न्यायालयात येऊन साक्ष देत

आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला हाकेच्या अंतरावरती लोकांची घरे आहेत.

०६. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयामध्ये माझ्या आई व वडिलांमध्ये कौटुंबिक वाद सुरु आहेत याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई माझ्या वडिलांना मला मोकळे करुन टाक असे म्हणत होती, त्यामुळे माझ्या आई व वडिलांमध्ये भांडण होत होते. हे म्हणणे खरे नाही की, वरील प्रमाणे घटना घडली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने दाखल केलेल्या केसला पुष्टी मिळावी यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : २९/०४/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण